**तात्काळ अति महत्वाचे**

# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
**Email ID : education.nmc@gmail.com**

जा.क्र. शि.वि./2859/2016
दि. 14/09/2016

## परिपत्रक

शिक्षण विभागातील सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना या परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात येते की, मा. आयुक्त यांनी दि. 16.8.2016 च्या सभेत ई–गर्व्हनन्स मॉडयूल च्या वापरासंबंधात खाली दिलेल्या दिशा निर्देशानुसार त्वरीत कारवाई करण्यात यावी.

1) शिक्षण विभागास प्राप्त होणाऱ्या सर्व रक्कमा तसेच सर्व प्रकारची देयके ई–गर्व्हनन्स मॉडयूल अंतर्गत वित्त विभागास सादर करावी. अन्यथा देयके मंजूर करण्यात येणार नाही.
2) शिक्षण विभागात असणारे सद्यःस्थितीत व पुढे वेळोवेळी खरेदी करण्यात येणाऱ्या सर्व फर्निचर/उपस्कर/संगणक व इतर सर्व साहित्यांची नोंद स्टोअर मॉडयूलमध्ये घेण्यात यावी.
3) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सर्व प्रकारच्या रजांचे केवळ (किरकोळ/वैकल्पिक/नैमित्तीक/अर्जीत/वैद्यकीय) ऑन लाईन अर्ज स्विकारण्यात यावे. अन्य माध्यमातून सादरकेलेले अर्ज मंजूर केल्या जाणार नाही.
4) डी.एम.एस, आर.टी.आय. व पी.जी.आर. मॉडयूल त्वरीत सुरू करावे.. तसेच शाळा निरीक्षण अहवाल, विद्यार्थ्यांची डाटा बेस नोंद, शाळा इमारतींची माहिती इत्यादींची नोंद ई–गव्हर्नन्स द्वारे विकसीत करण्यात आलेल्या मॉडयूलमध्ये घेण्यात यावी. .

सर्व संबंधीत कर्मचाऱ्यांनी आपले युजर नेम व पासवर्ड त्वरीत ई–गर्व्हनन्स सेलमधून प्राप्त करावे व त्वरीत ई–गर्व्हनन्स मॉडयूल च्या वापरासंबंधी वरील दिलेल्या दिशा निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. या संदर्भात काही अडचणी उद्भवल्यास ई–गर्व्हनन्स सेल अथवा श्री. विनय बगले, नोडल ऑफीसर यांचेशी संपर्क साधावा.

शिक्षण विभागाद्वारे वरील दिलेल्या दिशा निर्देशानुसार करण्यात आलेल्या कारवाईबाबत मा. आयुक्त लवकरच आढावा सभा घेणार आहेत. या कामात हयगय केल्याचे आढळून आल्यास संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन स्थगित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(फारूक अहमद खान)
शिक्षणाधिकारीनागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रतिलीपी माहितीस्त सादर

1) मा. आयुक्त, मनपा नागपूर
2) मा. अप्पर आयुक्त (III) मनपा नागपूर
3) मा. उपायुक्त (I) मनपा नागपूर